# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त एच/पूर्व यांचे कार्यालय,१३७ टी.पी.एस. ५, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई- ४०० ०५५

**क्र.स.आ.एच/पूर्व/ /एस.आर/स.अ.(परि.) दि.**

## स्वारस्य अभिव्यक्ती

एच/पूर्व विभागातील, सांताक्रुझ (पूर्व) प्रभाग क्र.८७ मधील प्रभात कॉलनी मनपा शाळा येथे सार्वजनिक गणेशोत्सव-२०२६ दरम्यान "सुव्यवस्था तसेच संभाव्य अपघात व आपत्कालीन परिस्थितीमुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या स्वयंसेवकांकरिता आयोजित प्रथम प्रतिसादक प्रशिक्षण देण्याकरीता" सोयी-सुविधा पुरविणे या कामाकरीता महानगरपालिकेच्या अटी व शर्तीसापेक्ष म.न.पा. अधिकृत ठेकेदार यांच्याकडून अर्ज मागवित आहे.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/पुर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सर्व अर्जदारांकडून अर्जाचा नमुना हा रु.४००/- + १८% टक्के GST कर व इसारा अनामत रक्कम रू. १५००/- यशस्वी कंत्राटदाराकडून स्वतंत्रपणे भरून घेण्यात येईल.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. १०.०९.२०२६ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत आहे. अर्ज जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांची मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि.१०.०९.२०२६ रोजी दुपारी ०५.०० नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक १०.०९.२०२६ रोजी दुपारी ५:०० नंतर सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत कंत्राटदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडती करिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत कंत्राटदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत कंत्राटदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता(परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विभाग कार्यकारी अभियंता 'एच/पूर्व' विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारली जाणार नाही.

**सोबत-** उपरोक्त अंतर्गत आवश्यक बाबींची सूची व प्रमाण/संख्या यांचा तक्ता जोडला आहे. सदर रकान्यात आपले इच्छुक दर नमूद करून सीलबंद लिफाफ्याद्वारे या कार्यालयात जमा करावेत.

Sd/-

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग**